पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण >> पान 2

भर पावसात शिवाजी पार्कात विद्यार्थ्यांचा महापूर, नव्या पिढीचे ठाकरे बंधू रस्त्यावर >> पान 3

महाराष्ट्र राज्य विधिमंडळ अंदाज समितीचा तीन दिवसीय बुलढाणा दौरा >> पान 4

**सुविचार**

उत्साही असावे पण उतावीळ होऊ नये.
कृतज्ञ असावे पण कृतघ्न नसावे.


दैनिक


# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 10 ■ शनिवार, दि. 25 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## ‘नीट’ पेपर लीकप्रकरणी केंद्र सरकारची मोठी कारवाई

# NTA च्या ४७ भ्रष्ट अधिकाऱ्यांची हकालपट्टी

**दैनिक आपला विदर्भ**

**बडतर्फ केलेल्या अधिकाऱ्यांवर कायदेशीर व गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था :** 'नीट' (NEET-UG) प्रवेश परीक्षेतील अनियमितता आणि गैरकारभारावरून दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीकडून (CJP) तीव्र आंदोलने सुरू असतानाच, केंद्र सरकारने याप्रकरणी अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (NTA) आपल्या ४७ अधिकाऱ्यांना तातडीने सेवेतून बडतर्फ केले आहे. तसेच आणखी अनेक अधिकाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार असल्याचे शुक्रवारी सूत्रांकडून समजते आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षा पद्धतीतील अनियमितता दूर करून संपूर्ण यंत्रणेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी शिक्षण मंत्रालयाकडून हे मोठे अभियान राबवले जात आहे. या कारवाईपूर्वी गुरुवारी केंद्र सरकारने प्रशासनात मोठा फेरबदल करत १७ आयएएस (IAS) अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या. यामध्ये उच्च शिक्षण विभागाच्या तत्कालीन सचिवांना पदावरून हटवून त्यांच्या जागी १९९४ च्या बॅचचे आयएएस अधिकारी नरेश पाल गंगवार यांची नवे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**कायदेशीर आणि गुन्हेगारी कारवाईची तयारी**

NTA या संस्थेच्या संपूर्ण पुनर्रचना आणि सुधारणा अभियानाचा भाग म्हणून दोषी आढळलेल्या काही अधिकाऱ्यांवर कायदेशीर तसेच गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई केली जाणार आहे. भविष्यात या संस्थेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी अनेक सुधारणात्मक पावले उचलली जातील आणि परीक्षा आयोजनाच्या 'आउटसोर्सिंग' मॉडेलमध्येही आमूलाग्र बदल केले जातील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**NTA च्या संपूर्ण पुनर्रचनेला सुरुवात**

गेल्या काही काळापासून पेपर लीक आणि परीक्षांमधील गोंधळामुळे NTA च्या कारभारावर सातत्याने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. विद्यार्थ्यांचा वाढता असंतोष पाहता, प्रशासकीय चौकशीच्या अहवालाच्या आधारे एजन्सीच्या संपूर्ण संरचनेत व्यापक बदल (ओवरहॉल) करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आगामी दिवसांत परीक्षा यंत्रणा अधिक पारदर्शक, विश्वासार्ह आणि मजबूत करण्यासाठी आणखी काही अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, असे संकेत शिक्षण मंत्रालयाच्या वतीने देण्यात आले आहेत.

उल्लेखनीय आहे की, NTA वर देशातील प्रमुख प्रवेश परीक्षांची जबाबदारी असते. यामध्ये NEET (UG), राष्ट्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (NTET), JEE (Main), CUET (UG व PG), UGC-



NET, राष्ट्रीय सामायिक प्रवेश परीक्षा (NCET) आणि ICAR AIEEA (PG) यांसारख्या अनेक महत्त्वाच्या परीक्षांचा समावेश आहे. मात्र, NEET पेपर लीक प्रकरणामुळे या एजन्सीच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. NTA पूर्णपणे बरखास्त करण्याची मागणी काही घटकांकडून केली जात असली, तरी असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

### केंद्रीय मंत्रिमंडळाकडून ‘पेपर लीकविरोधी’ विधेयकाला मंजुरी

NTA वरील या कारवाईच्या काही तास आधीच, केंद्रीय मंत्रिमंडळाने पेपर लीक प्रकरणांना आळा घालण्यासाठी अत्यंत कडक शिक्षेची तरतूद असलेल्या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली संसद भवन परिसरात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाला हिरवा कंदील दाखवण्यात आला असून, पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत मांडले जाणार आहे.

हे नवीन विधेयक 'सार्वजनिक परीक्षा (अयोग्य मार्गांना प्रतिबंध) अधिनियम, २०२४' मध्ये सुधारणा करेल. या कायद्यानुसार संघटित पद्धतीने पेपर लीक करणाऱ्या गुन्हेगारांना १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि तब्बल १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

### जंतरमंतरवर अंगठा लावा अभियान सुरू

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा एक नवीन मार्ग स्वीकारला आहे. आंदोलनस्थळी अंगठा लावा अभियान (अंगठ्याचे ठसे उमटवण्याची मोहीम) सुरू करण्यात आले आहे. येथे झाडाच्या फांद्यांचे चित्र असलेला एक मोठा कॅनव्हास उभारण्यात आला आहे. विद्यार्थी, तरुण आणि सामान्य नागरिकांसह सहभागी लोक पानांच्या जागी आपल्या अंगठ्याचे ठसे उमटवत आहेत. देशभरातील तरुण त्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत, हा संदेश शिक्षण मंत्र्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे अंगठ्याचे ठसे त्यांना पाठवले जाणार असल्याचे आंदोलकांनी सांगितले आहे.

### पोलिसांच्या अत्याचाराविरोधात सीजेपी सुरू करणार वेबसाईट- सौरव दास यांची घोषणा

सीजेपी पोलिसांच्या अत्याचारांविरुद्ध एक वेबसाईट सुरू करत आहोत, अशी सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास यांनी घोषणा दिली. जर संबंधित पोलिसांविरोधात गुन्हा दाखल न झाल्यास न्यायालयात जाणार आहोत. गुन्हा दाखल केल्यानंतरही त्यांच्यावर कारवाईसाठी पाठपाठपुरावा करून त्यांना तुरुंगात पाठविणार आहोत, असा इशारा सौरव दास यांनी दिला.

### सीजेपीच्या दोन मागण्या सरकारकडून मान्य, तिसरी मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरुच राहणार



परीक्षेतील अनियमिततेवरून सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, कॉकरोच जनता पार्टीचे प्रतिनिधी आणि केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांच्यासह भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लब येथे उच्चस्तरीय चर्चा करण्यात आली. शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करणे आणि परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीमुळे (पेपर लीक) बाधित झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई देणे, या सीजेपीच्या दोन मागण्या सरकारनं मान्य केल्यानंतर ही चर्चा होत आहे. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही त्यांची मुख्य मागणी कायम आहे. ती पूर्ण होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.

# ८० लाख ७१ हजार महिला लाडकी बहीण योजनेस अपात्र

**१ कोटी ६६ लाख २८ हजार ४८ बहिणींना नियमित लाभ**

**मुंबई । प्रतिनिधी :** महायुती सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. या छाननीनंतर १ कोटी ६६ लाख २८ हजार ४८ महिला योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जून महिन्याचा हप्ता वर्ग करण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे याच महिलांना योजनेचा नियमित लाभ मिळणार आहे. तर, तब्बल ८० लाख ७१ हजार ९५२ महिला अपात्र ठरल्या आहेत.

महायुती सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली तेव्हा राज्यभरातून तब्बल २ कोटी ४७ लाख महिलांचे अर्ज आले होते. मात्र, कागदपत्रांची आणि अर्जांची काटेकोर छाननी केल्यानंतर मोठा वर्ग योजनेच्या निकषांनुसार अपात्र ठरला आहे. दरम्यान, एकूण २४ लाख महिलांनी अर्जात स्वतः ची नोंद 'शासकीय कर्मचारी' अशी केली होती, ज्यामुळे त्या सुरुवातीला अपात्र ठरल्या होत्या. राज्य सरकारने ही चूक दुरुस्त करण्यासाठी चार महिन्यांची विशेष मुदत दिली होती.



**१२ हजार कोटींची बचत**

लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारला वार्षिक सुमारे ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागते. आता लाभार्थी महिलांची संख्या १ कोटी ६६ लाख अशी निश्चित झाल्याने सरकारचा महिन्याचा प्रत्यक्ष खर्च २ हजार ४५९ कोटी रुपये इतका होणार आहे. यामुळे राज्य शासनाची वार्षिक सुमारे १२ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे.

## गुजरातेत पावसाचा कहर सुरूच; ३८ हजार नागरिकांचे स्थलांतर

अहमदाबाद/गुवाहाटी/लखनौ; वृत्तसंस्था : देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरस्थिती गंभीर झाली आहे. गुजरात, आसाम, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील अनेक भागांना पावसाचा मोठा फटका बसला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. गुजरातमध्ये अनेक जिल्हे पुराच्या पाण्याखाली गेले असून नवसारी, वलसाड, अहमदाबाद आणि सूरतमध्ये परिस्थिती गंभीर झाली आहे.



गुजरातच्या वलसाड जिल्ह्यातील उमरगाम तालुक्यात अवघ्या १६ तासांत तब्बल ४३ इंच पावसाची नोंद झाली. या विक्रमी पावसामुळे सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. नवसारी जिल्ह्यातील मेघर गाव पूर्णपणे पुरात बुडाले असून घरांच्या पहिल्या मजल्यापर्यंत पाणी पोहोचले आहे. नागरिकांना बाहेर काढण्यासाठी भारतीय तटरक्षक दलाच्या हेलिकॉप्टरचा वापर करण्यात आला. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने राज्यभरात आतापर्यंत सुमारे ३८ हजार नागरिकांचे स्थलांतर केल्याची माहिती देण्यात आली आहे. सुरेंद्रनगर जिल्ह्यात एनडीआरएफच्या पथकांनी बोटींच्या मदतीने ६७ नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले. गुजरातमध्ये पुराच्या पाण्याच्या प्रवाहात एक कार वाहून गेली. या कारमध्ये सहा जण होते. त्यापैकी चार जणांचा मृत्यू झाला.

आसाममध्येही मुसळधार पावसामुळे अनेक भाग जलमय झाले आहेत. गुवाहाटीतील काही भागांमध्ये पेट्रोल पंप पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने सेवा बंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशात गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गंगा, यमुना यांसह दहा प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. सीतापूर जिल्ह्यात रस्त्यांवर पाणी भरल्याने गावकऱ्यांना नावेतून प्रवास करावा लागत आहे.

# विद्यार्थ्यांवरील कथित पॅलेट गन कारवाईवरून राहुल गांधींचा केंद्रावर हल्लाबोल; धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी

**पेपरफुटी प्रकरणावरून केंद्र सरकारवर टीका; विद्यार्थ्यांच्या तीन प्रमुख मागण्या मांडल्या**

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी दिल्ली । प्रतिनिधी :** नीट आणि इतर भरती परीक्षांमधील कथित पेपरफुटीच्या निषेधार्थ सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान आंदोलकांवर पॅलेट गनचा वापर झाल्याचा आरोप करत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

दिल्लीतील १० जनपथ येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राहुल गांधी यांनी जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याला माध्यमांसमोर आणले. हा विद्यार्थी हातात तिरंगा घेऊन शांततेत आंदोलन करत असताना त्याच्यावर पॅलेट गनचा वापर करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. या घटनेत



संबंधित विद्यार्थ्याच्या डोळ्याला गंभीर दुखापत झाली असून एका डोळ्याची दृष्टी गेल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला. मात्र, केंद्र सरकारने विद्यार्थ्यांवर पॅलेट गनचा वापर झाल्याचे आरोप फेटाळले आहेत.

पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून, वर्षानुवर्षे मेहनत करून परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांवर अन्याय झाला आहे, असे राहुल गांधी म्हणाले. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या काहींनी प्रश्नपत्रिका विकत घेतल्या, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांना त्याची शिक्षा भोगावी लागली, असा आरोपही त्यांनी केला.

यावेळी राहुल गांधी यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर टीका करत, शिक्षण व्यवस्थेच्या अपयशाची नैतिक



जबाबदारी त्यांनी स्वीकारावी आणि पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली.

सरकारसमोर विद्यार्थ्यांच्या तीन प्रमुख मागण्या मांडताना राहुल गांधी यांनी धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटविणे, आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित कारवाईची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणे आणि या संपूर्ण प्रकरणाबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील तरुणांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली.

दरम्यान, विद्यार्थ्यांवर पॅलेट गनचा वापर झाल्याच्या आरोपांवरून केंद्र सरकार आणि काँग्रेस यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू असून, या प्रकरणामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

## महाराष्ट्रासह १७ राज्यांत मुसळधार पाऊस पडणार, हवामान विभागाचा अंदाज

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय हवामान विभागाने देशातील हवामानाबाबत अत्यंत महत्त्वाचा आणि चिंता वाढवणारा इशारा जारी केला आहे. गंगेच्या मैदानी भागातील पश्चिम बंगालच्या उत्तर भागात 'वरच्या हवेचे चक्रीवादळ सदृश चक्राकार वारे' सक्रिय आहेत. दक्षिण-पूर्व राजस्थान आणि लगतच्या परिसरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. मान्सूनच्या तीव्र हालचालींमुळे पुढील २४ ते ४८ तासांत दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार आणि महाराष्ट्रासह देशातील १७ राज्यांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, राजस्थान, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-कश्मीर, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. या कालावधीत ताशी ७० ते ८५ किमी वेगाने वादळी वारे वाहू शकतात. विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि काही भागांत गारपिटीची शक्यता आहे.

गुजरातमध्ये नवसारीत एअरलिफ्ट, वलसाडमध्ये १६ तासांत ४३ इंच पाऊस झाला. तर वलसाडच्या उमरगाम तालुक्यात अवघ्या १६ तासांत ४३ इंच पावसाची नोंद झाली आहे. नवसारीमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी हेलिकॉप्टरद्वारे एअरलिफ्ट करण्यात आले. अहमदाबाद, सुरतसह ५ शहरांच्या बाजारपेठा



आणि सखल भाग पाण्याखाली गेले आहेत. उत्तर प्रदेशमध्ये १० नद्यांना पूर आला आहे. तर गेल्या १० दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे गंगा आणि यमुनासह १० नद्या दुथडी भरून वाहत आहेत. सीतापूर जिल्ह्यामध्ये मुख्य रस्ते पूर्णपणे पाण्याखाली गेल्याने गावकऱ्यांना प्रवासासाठी बोटींचा वापर करावा लागत आहे. बिहारमध्ये पाटणा, भोजपूर, बक्सर, गोपालगंज, सारण, वैशाली आणि सिवानसह १९ जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राजस्थानमध्ये बांसवाडा आणि डुंगरपूरसह ११ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा कायम आहे.

उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-कश्मीर या डोंगराळ भागांत भूस्खलनाची शक्यता असल्याने नागरिकांनी प्रवास टाळावा किंवा हवामान अंदाज पाहूनच बाहेर पडावे. वादळी वाऱ्यांमुळे मच्छीमारांनी समुद्रात जाऊ नये, तसेच शेतकऱ्यांनी उघड्यावर न राहता सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. अशा सूचना केल्या आहेत. दिल्लीत ताशी ४०-५० किमी वेगाने वारे वाहून पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर मुंबईत पावसाच्या जोरदार सरी बरसण्याचा अंदाज आहे.

## महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचा वाटा महत्त्वाचा

विठ्ठलाच्या भक्तीने प्रेरित वारी ही केवळ पंढरपूरची यात्रा नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाला जोडणारी अखंड परंपरा आहे. संतविचार, समता, लोकशिक्षण आणि सामूहिक साधनेचा संदेश देणारी ही वारी महाराष्ट्राच्या संस्कारांचा जिवंत आत्मा आहे. श्रीविठ्ठलाच्या भेटीची आस घेऊन लाखो पावले पंढरीकडे निघतात ती म्हणजे वारी. हा केवळ धार्मिक किंवा भक्ती सोहळा नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. शेकडो वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा महाराष्ट्राला एकसंध ठेवणारी, संतविचारांचा प्रसार करणारी आणि समाजाला नैतिकतेची दिशा देणारी आहे. वारी एक जीवनपद्धती आहे, सामूहिक साधना आहे, लोकशिक्षणाची प्रभावी यंत्रणा आहे आणि संतांनी घडविलेल्या महाराष्ट्राच्या संस्कारांचा अविभाज्य भाग आहे. वारी म्हटले की, डोळ्यांसमोर टाळ-मृदंगांच्या गजरात, मुखी विठ्ठलनाम आणि हृदयात भक्तिभाव घेऊन पंढरपूरच्या दिशेने चालणाऱ्या लाखो वारकऱ्यांचे चित्र उभे राहते. 'वारकरी' या शब्दाचा अर्थ वारी करणारा असा आहे. वर्षानुवर्षे, पिढ्यान् पिढ्या अत्यंत नियमितपणे ही परंपरा अखंड सुरू आहे. वारकरी पंढरपूरला जातो तो केवळ देवदर्शनासाठी नव्हे, तर आत्मिक समाधानासाठी, संतविचारांच्या अनुभवासाठी आणि भक्तीच्या सामूहिक उत्सवात सहभागी होण्यासाठी. या परंपरेचा केंद्रबिंदू आहे विठ्ठल. विठ्ठल हे श्रीकृष्णाचेच रूप मानले जाते. पुंडलिकाच्या भक्तीने प्रसन्न होऊन विठ्ठलरूपात जणू श्रीकृष्ण पंढरपूरला आले, अशी परंपरा सांगते. त्यावेळी पुंडलिक हे आई-वडिलांच्या सेवेत मग्न होते. देव स्वतः समोर उभा असतानाही त्यांनी प्रथम माता-पित्यांची सेवा पूर्ण केली आणि विठ्ठलाला उभे राहण्यासाठी वीट दिली. ही घटना केवळ भक्तीची नव्हे, तर कर्तव्यनिष्ठेची सर्वोच्च शिकवण आहे. पुंडलिकांमुळेच वारकरी संप्रदायाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांनी स्वतःच्या मोक्षाची याचना केली नाही. भक्तांचा उद्धार कर, अशी विनंती विठ्ठलाकडे केली. यातून वारकरी परंपरेचा मूलभूत विचार स्पष्ट होतो, तो म्हणजे स्वतःपुरता नव्हे, तर सर्वांच्या कल्याणाचा विचार! वारीची सुरुवात नेमकी कधी झाली, याचा ठोस ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही; मात्र ही परंपरा प्राचीन असल्याचे संत साहित्यातील उल्लेखांवरून स्पष्ट होते. वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य म्हणजे, हा वैयक्तिक परमार्थ नसून, सामूहिक परमार्थ आहे. योगमार्ग, ज्ञानमार्ग किंवा इतर अनेक आध्यात्मिक मार्ग वैयक्तिक स्वरूपाचे असतात; मात्र वारी ही समूहाने केली जाते. भजन सामूहिक असते, कीर्तन सामूहिक असते, दिंडी सामूहिक असते. त्यामुळे वारी ही लोकांना जोडणारी, एकत्र आणणारी आध्यात्मिक प्रक्रिया आहे. दिंडी हा वारीचा आत्मा आहे. गावोगावचे वारकरी एकत्र येतात. टाळ-मृदंगाच्या तालावर विठ्ठलनामाचा गजर करत पायी पंढरपूरकडे वाटचाल करतात. या प्रवासात नामस्मरण, अभंग गायन, भारूड, भजन, कीर्तन, फुगड्या, खेळ अशा विविध माध्यमांतून भक्तीचा उत्सव साजरा होतो. त्यामुळे वारी ही केवळ परमार्थ नसून, भक्तीचा आनंदोत्सव ठरते. ईश्वराने दिलेल्या मानवी जन्माचे सार्थक करण्याचा हा आनंदसोहळा आहे. विशेष म्हणजे, वारकरी पंढरपूरला जाऊन काही मागत नाही. नवस करत नाही. विठ्ठलाचे दर्शन हेच त्याचे समाधान असते. त्याला फक्त देवाची कृपा हवी असते. देव आणि भक्त यांच्यातील हा अत्यंत निरपेक्ष संवाद म्हणजे वारी. वारकरी संप्रदायात संगीताला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. भजन म्हणजे संगीत. अभंग म्हणजे संगीत. भारूड म्हणजे संगीत. वारीत गाणे, नाचणे आणि खेळणे यांना तितकेच महत्त्व आहे. हा केवळ प्रवचनांचा संप्रदाय नाही, तर लोककलांमधून अध्यात्म जगणारा संप्रदाय आहे. या परंपरेला संघटित स्वरूप देण्याचे मोठे कार्य संत नामदेवांनी केले. विविध दिंड्यांचे एकत्रीकरण करून त्यांनी 'फड' ही संकल्पना निर्माण केली. एका फडात अनेक दिंड्या सहभागी होत. पंढरपूरमध्ये या फडांमुळे वारकरी संघटित झाले. वर्षभर चालणाऱ्या भजन-कीर्तनाच्या परंपरेला त्यांनी शिस्तबद्ध रूप दिले. कीर्तन पद्धतीलाही त्यांनी आकार दिला. वारकरी संप्रदायाला तात्त्विक अधिष्ठान मिळाले ते संत ज्ञानेश्वरांमुळे. प्रत्येक धर्माला एक प्रमाणग्रंथ आवश्यक असतो. वारकरी संप्रदायासाठी तो ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्वरी'. ज्ञानेश्वरांनंतर सर्व संतांनी अभंग रचना केल्या. त्या दिंड्यांमध्ये गायल्या जाऊ लागल्या. त्यामुळे वारकरी परंपरेला समृद्ध साहित्य मिळाले. संत ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर उत्तर भारतातून परकीय आक्रमणे झाली. अशा काळात महाराष्ट्रात धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवण्याचे मोठे कार्य वारकरी संप्रदायाने केले. नंतर मराठ्यांचे राज्य आले. त्यानंतर इंग्रजांचे राज्य आले. या साऱ्या राजकीय उलथापालथीत वारी कधीच थांबली नाही. उलट समाजाला एकत्र ठेवण्याचे कार्य ती सातत्याने करत राहिली. विशेष म्हणजे, वारकरी संप्रदायात धर्मांतराचे एकही उदाहरण दिसत नाही. यामागे संत साहित्याची आणि विठ्ठल भक्तीची ताकद होती. मुंबई विद्यापीठाचे पहिले कुलगुरू अलेक्झांडर ग्रँट यांनी तुकाराम महाराजांच्या अभंगांचा अभ्यास करून त्यांची संशोधित गाथा प्रकाशित करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. संत ज्ञानेश्र्वर, संत नामदेव, संत भानुदास, संत एकनाथ, संत तुकाराम यांनी मराठीत अध्यात्म मांडले. त्यांच्या साहित्याने महाराष्ट्राची मानसिकता घडवली. आजही संतांचे अभंग लाखो लोकांच्या मुखी आहेत. संत साहित्य हेच महाराष्ट्राच्या संस्कारांचे मुख्य स्रोत आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत संतांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. संतांनी निर्माण केलेल्या नैतिकतेच्या आणि सामाजिक ऐक्याच्या पायावरच छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य उभे राहिले. वारकरी संप्रदायाने समाजात आत्मविश्र्वास, संघटन आणि स्वाभिमानाची भावना जागृत केली. महाराष्ट्राला एका भाषेत, एका सांस्कृतिक धाग्यात बांधण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले. पंढरपूर ही सर्व महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी बनली. गावागावांतील लोक वर्षातून दोनदा येथे एकत्र येऊ लागले. त्यामुळे भाषिक आणि सांस्कृतिक एकात्मता अधिक दृढ झाली. वारकरी परंपरेत पालखीचे आगमन नंतर झाले. सुरुवातीला केवळ दिंड्या असत. वारीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, तिची स्वअनुशासनाची परंपरा. लाखो लोक सहभागी होऊनही वारीला कधी गालबोट लागले नाही. कारण, वारकरी स्वतःला संतांचे पाईक मानतो. संतांच्या विचाराला धक्का पोहोचेल, असे कोणतेही वर्तन तो करत नाही. ही आचारसंहिता कुणी लादलेली नाही. ती संस्कारातून आलेली आहे. वारीची खरी ओळख तिच्या अध्यात्मिक स्वरूपात आहे. ती भौतिक उपयुक्ततेच्या कसोटीवर मोजण्याची गोष्ट नाही. ती अनुभवण्याची गोष्ट आहे. वारकरी संप्रदाय हा गाजावाजा करणारा धर्म नाही. तो भागवत धर्माचीच एक उत्क्रांत परंपरा आहे. विठ्ठल आणि वारकरी परंपरा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्राला एकत्र ठेवणारा सांस्कृतिक धागा म्हणजे वारी.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना कर्जमुक्ती प्रमाणपत्रांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण

## संकटातील शेतकऱ्यांसाठी देशातील सर्वात मोठी कर्जमाफी देण्याचा शब्द पाळला – मुख्यमंत्री

**दैनिक आपला विदर्भ**



**पंढरपूर । प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती झाल्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात कर्जमुक्तीचे प्रमाणपत्र आणि जिल्हा बँकेच्यावतीने नव्याने पीककर्जाचे धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे वितरीत करण्यात आले. संकटांमध्ये आलेल्या व कर्ज भरू शकला नाही अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कर्जमाफी देण्याचा शब्द राज्यशासनाने पाळला असून देशातली ही सर्वात मोठी कर्जमाफी राबविण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित सुधाकरपंत परिचारक राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नियमित कर्ज भरलेल्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या खात्यावर ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. कर्जमाफीची भव्य सुरुवात करण्याऐवजी पांडुरंगाच्या नगरीत जिथे शेतकरी, वारकरी इतक्या मोठ्या प्रमाणात येतात, तिथून याची सुरुवात करावी या उद्देशाने आज येथून कर्जमाफीची सुरुवात करण्यात येत आहे. त्यानुसार सहकार विभागाने १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी जाहीर केली असून १३ हजार कोटी रुपये या शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१ तारखेपूर्वीच जमा करण्यात येणार आहेत. यापुढे जसजशी बँकाकडून माहिती जमा होईल तसतशा पुढील याद्या जाहीर करून कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात येईल. एकही पात्र शेतकरी या योजनेतून मागे राहणार नाही, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

ते पुढे म्हणाले, ७.५ हॉर्स पॉवरच्या आतील कृषीपंपांची वीजबिल माफी देण्यासाठी दरवर्षी २४ ते २५ हजार कोटी रुपये राज्य सरकार आपल्या तिजोरीतून महावितरणला देते. आता कर्जमुक्तीबरोबरच यापूर्वीची या कृषीपंपांची थकीत वीज देयकांची रक्कमही माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून ५० लाख शेतकऱ्यांचं ४८ हजार कोटी रुपयांचे वीजबिल माफ केलेले आहे. आता राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना आपण दिवसा वीज देतो आहोत. येत्या डिसेंबर किंवा मार्चपर्यंत १०० टक्के शेतकऱ्यांना आम्हाला दिवसा १२ तास वीज देण्यात येणार आहे.

कर्जमाफी, विजदेयकांच्या रकमेची माफी याव्यतिरिक्त गतवर्षी शेती क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या सबसिडींच्या माध्यमातून, ठिबक सिंचन, खते, ट्रॅक्टर किंवा यांत्रिकीकरण आदींसाठी सुमारे ९५ हजार कोटी खर्च केले आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी हे सरकार अतिशय ताकदीने उभे आहे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, वारीची परंपरा शतकानुशतके चालली असून दरवर्षी लाखो वारकरी चालत चालत पंढरपूरपर्यंत येतात. वारीमध्ये प्रत्येकालाच पांडुरंगाचे दर्शन मिळतेच असे नसले तरी कोणी कळस दर्शन, कोणी मुख दर्शन, नामदेव पायरीचं दर्शन घेतात आणि पांडुरंगाची भेट झाल्याचा अनुभव प्रत्येक वारकऱ्याला या ठिकाणी प्राप्त होतो. वारीच्या परंपरेत प्रत्येक व्यक्ती समोरचा वारकरी, व्यक्तीमध्ये आपल्या माऊलीचे दर्शन घेत असतो. आणि अत्यंत भावनिक आणि कौटुंबिक असा वारीचा सोहळा आपल्याला पंढरपूरमध्ये पाहायला मिळतो.

यावेळी विक्रमी असे ३५ लाखांपेक्षा जास्त वारकरी पंढरपूरला येत आहेत. जवळजवळ २१ किलोमीटरची दर्शनाची रांग यावेळी लागलेली आहे. मात्र राज्य शासन, जिल्हा प्रशासनाच्यावतीने अतिशय उत्तम सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. वारकऱ्यांच्या निवाससाठी जर्मन हँगर्स, तेथे पाद्य सेवा, वैद्यकीय सेवा आदी सर्व प्रकारच्या सेवा अतिशय उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे. वारीची परंपरा अशीच वाढत राहणार असून त्याप्रमाणे दरवर्षी सुविधा देण्याचे काम करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत सर्वांचे शंभर टक्के पुनर्वसन पंढरपूरच्या कॉरिडॉर विकासाची जवळ-जवळ सर्व तयारी झाली आहे. काही थोड्या लोकांच्या मनात शंका असल्या तरी चर्चेतून त्या सर्व शंका दूर करून सर्वांचे चांगल्यात चांगले पुनर्वसन करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही तीर्थक्षेत्रामध्ये आजपर्यंत झालेल्या पुनर्वसनापेक्षा उत्तम, चांगलं आणि मोठं पुनर्वसन हे या ठिकाणी आम्ही पंढरपूरच्या कॉरिडॉरमध्ये देत आहोत. १०० टक्के लोकांचे समाधान करण्याचा उद्देश घेऊन हे काम आम्ही करत आहोत, असेही ते म्हणाले.

पंढरपूरमध्ये ३०-३० लाख शिस्तबद्ध पद्धतीने लोक येतात. मात्र, अपघात हा सांगून येत नाही. त्यामुळे सर्वांच्या मनामध्ये वारी संपून आणि वारकरी सुखरूप घरी जाईपर्यंत सर्व नीट व्हावे अशी एक भीती असते. या वाढत्या वारकऱ्यांकरता आणि आता देशभरातून दर्शनकरिता येणाऱ्या भाविकांची योग्य व्यवस्था व्हाव्यात, या दृष्टीने खऱ्या अर्थानं या सगळ्या व्यवस्था येथे केल्या असून पंढरपूर कॉरिडॉरमुळे चांगल्या सुविधा निर्माण होतील, असेही ते म्हणाले.

२०१५-१६ साली स्व. सुधाकरपंत परिचारक यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून या प्रदर्शनाची सुरुवात केली. पंढरपूरला येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार आहे. म्हणून त्यांच्यापर्यंत शेतीच्या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान, नवीन प्रयोग पोहोचले पाहिजेत, या दृष्टीने या कृषी प्रदर्शनाची सुरुवात झाली. राज्यातल्या उत्तम बाजार समित्यांमध्ये गणना होत असलेली ही बाजार समिती अतिशय उत्तम कारभार करत असून १६ कोटींपासून प्रचंड मोठी भरारी घेत समितीने मोठा विस्तार केलेला आहे, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी बाजार समितीचा गौरव केला.

शेतीमध्ये एआयला चालना; महा विस्तार ॲपचा वापर करावा मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आपल्या शेतीमध्ये आधुनिकता आली पाहिजे, उत्पादनाचा खर्च कमी करता आला पाहिजे, उत्पादकता वाढली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांचा नफा वाढला पाहिजे, अशा पद्धतीने आज आपण राज्यात वेगवेगळे प्रयोग सुरू केले आहेत. भविष्यामध्ये शेतीच्या क्षेत्रामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताचे ( एआय) महत्त्व ओळखून, देशात पहिल्यांदा महाराष्ट्राने शेतकऱ्यांकरिता महा विस्तार नावाचे एआय ॲप तयार केले आहे. जवळपास ५० लाख शेतकऱ्यांनी महा विस्तारवर नोंदणी केली असून उर्वरित शेतकऱ्यांनीही या ॲपवर नोंदणी करून उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

महा विस्तार म्हणजे एक प्रकारचा एआय एजंट असून आपण त्याच्याशी संवाद साधून शेतीशी संबंधित खतांचा वापर, कीड प्रतिबंध, पाण्याचं वापर आदी सर्व विषयांवरील प्रश्नांची उत्तरे, ज्ञान, माहिती जाणून घेऊ शकता. आधुनिक शेतीच्या प्रयोगाचे व्हिडिओ त्याच्यावर असून त्याच्यावर आहे. कुठल्याही नवीन पीक पद्धतीमध्ये काय केलं पाहिजे याची माहिती त्यात असून सगळ्या गोष्टींची माहिती ही प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या त्याच्या बोली भाषेत पर्सनलाईझ्ड पद्धतीने तेथे मिळते. पुढील काळात माती परीक्षणपासून सर्व सुविधा, पद्धती या केवळ आपल्या मोबाईलच्या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळवून देण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

भीमा नदीवर बॅरेजेस बांधण्याच्या मागणीच्या अनुषंगाने बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, आंतर राज्य लवादाचा निर्णयाची बंधने पाळतानाच त्यातून मार्ग काढून कशा पद्धतीने हे बंधारे तयार करता येतील, या संदर्भातले निर्देश संबंधित विभागाला देण्यात येईल. तसेच चंद्रभागा नदीवरचा जो नवीन पूल आहे, तो आता पूल कम बंधारा असा परिवर्तित करून त्याही ठिकाणी पाणी कसे अडवता येईल, याचाही हा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

दरवर्षी कोल्हापूर आणि सांगलीमध्ये शिरणाऱ्या पुराच्या पाण्यावर डायव्हर्जन कॅनल आपण सुरू केला असून यावर्षीच त्याचे काम पूर्ण होत आहे. यामुळे ३५ ते ४० टीएमसी पाणी हे तेथून उजनीमध्ये आणण्यात येणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह येथील दुष्काळी भाग आणि मराठवाड्याचा भाग या दोन्ही भागांना खूप मोठ्या प्रमाणात फायदा होईल. या पाण्यामुळे उजनीमधील मृत साठा वापरावा लागण्याची परिस्थिती पुढील काळात राहणार नाही.

रेल्वे मार्गाच्या अनुषंगाने बोलताना ते म्हणाले, पंढरपूरला तसेच सोलापूर जिल्ह्याला संपूर्ण दक्षिणेशी जोडण्याचे काम निश्चितपणे पूर्ण करू. लोणंद-पंढरपूर रेल्वेमार्गासाठी राज्यशासनाने पैसे दिले असून काम सुरू करायचे आहे. परंतु, पंढरपूर-विजापूर रेल्वेसाठीही मागील काळात केंद्र सरकारला विनंती केली असून त्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

पालकमंत्री श्री. गोरे म्हणाले, शेतकऱ्यांना कर्जमाफी, वीजमाफी देण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेतकरी समृद्ध, मजबूत होईल अशा पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकाळात काम केले आहे. ही वारी वारकऱ्यांना आनंद देणारी स्वच्छ आणि सुंदर अशी वारी होत आहे. जवळपास ३५ लाख वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी येत आहेत. पंढरीचा कॉरिडॉर च्या माध्यमातून वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी पायाभूत सोयी निर्माण करण्याचा मानस मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे. त्यामुळे हे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र होईल, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. परिचारक यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविलेल्या योजनांचा गौरवपूर्ण उल्लेख करत कर्जमुक्तीबद्दल मुख्यमंत्र्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात मुख्यमंत्री यांच्यावरील इन्फ्रामॅन : देवेंद्र फडणवीस- मेकिंग ऑफ महाराष्ट्र या पुस्तकाचे तसेच निवासी मूकबधिर विद्यालय पंढरपूरच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी प्रदर्शनातील दालनांना भेट देऊन माहिती जाणून घेतली.

कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात वारकरी, शेतकरी उपस्थित होते.

# वारी : चालणारी माणुसकी

चाललो होतो शोधायला मी देव मंदिरात,
वाटेत मला भेटला हा माणूस या प्रवासात;
जेव्हा भेटला मला हा खराखुरा माणूस इथे,
शोध संपला माझा, विठ्ठल भेटला मला तिथे.

पहाटेची पहिली सर आणि मातीतला तो मंद सुगंध, जणू निसर्गाचीच पावली साजरी करतोय. दूरवर कुठेतरी घुमणारे टाळ-मृदंगाचे लयबद्ध नादतून चालणारे ते लाखो अथांग पाय, मस्तकावर पांढरी गांधीटोपी, गळ्यात तुळशीची माळ, खांद्यावर भगवी पताका आणि ओठांवर सलग निनादणारा एकच गजर''ज्ञानोबा-तुकाराम...'' याहून अधिक पवित्र आणि चैतन्यमय प्रस्तावना या धरेवर दुसरी कोणतीही असू शकत नाही. ही केवळ पायपीट नाही, तर हा माणसाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचणारा एक आध्यात्मिक आणि वैचारिक प्रवास आहे.

पंढरपूरचा पांडुरंग महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे, पण तो केवळ मंदिरातील गाभाऱ्यात बसलेला दगड नाही. तो विटेवर कटीवर हात ठेवून उभा असलेला संयम आहे. त्याने कमरेवर हात ठेवून शतकानुशतके मानवाला एकच प्रश्न विचारला आहे''इतका उशीर का केला रे येण्याला?'' तो वाट पाहणारा दैव आहे, रुसणारा नाही. त्याच्या या प्रतीक्षेमागे भक्त पुंडलिकाचा अद्भूत दृष्टांत दडलेला आहे. पुंडलिकाने आई-वडिलांची सेवा करताना देवाला उभं राहण्यासाठी वीट फेकली, आणि देवही क्षणाचाही विलंब न लावता त्या विटेवर जाऊन उभा राहिला. ''आई-वडिलांची सेवा हीच सर्वोच्च ईश्वरसेवा आहे,'' हा भारतीय संस्कृतीचा पाया या विटेच्या प्रतीकातून घट्ट रुजला. ही वीट म्हणजे केवळ दगड नाही, तर तो कर्तव्य, संयम, प्रतीक्षा, सेवाभाव आणि नम्रतेचा मानवी चेहरा आहे. अभिमानावर कधीही देव उभा राहत नाही, म्हणून तर तो नम्रतेच्या विटेवर विसावला आहे.

हा देव शोधायचा कुठे? मंदिराच्या कळसावर की चालणाऱ्या वारकऱ्यांच्या अंतःकरणात? याचं उत्तर वारीच्या वाटेवर चालताना मिळतं. वारी ही कोणतीही यात्रा नसून ते चालतफिरतं विद्यापीठ आहे. हे चालतंजग समाजशास्त्र, मानसशास्त्र, लोकशाही, समता, व्यवस्थापन आणि सहजीवनाचे सर्वात मोठे पाठ देणारे केंद्र आहे. वारकरी म्हणजे केवळ तुळशीमाळ घातलेला मनुष्य नव्हे, तर ज्याने स्वत :मधील मी आणि अहंकार पूर्णपणे उतरवून ठेवला आहे, तो वारकरी! जो स्वतः तहानलेला असतानाही आपल्या पाठीमागच्या ओळखीच्या किंवा अनोळखी माणसाच्या हातात प्रेमाने पाण्याचा पेला देतो, तो खरा वारकरी.

या वारीच्या वाटेवर जात, पात, धर्म, श्रीमंत-गरीब, राजा आणि रंक, डॉक्टर आणि शेतकरी, शिक्षक आणि मजूर असे सगळे भेद विरघळून जातात. वारीत माणसाची बाह्य ओळख संपुष्टात येते आणि केवळ माणूस उरतो. ही चालती-बोलती लोकशाही आहे, जिथे प्रत्येकाला समान श्वास घेण्याचा अधिकार आहे. संत हे या समाजाचे खऱ्या अर्थाने हृदय आहेत. संत ज्ञानेश्वरांनी पसायदानाद्वारे विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना केली, संत तुकारामांनी ''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले'' यातून निखळ मानवतेचा धर्म शिकवला. चोखामेळ्यांनी जातीभेदाच्या भिंती पाडल्या, तर बहिणाबाई आणि जनाबाईंनी स्त्रीचे अध्यात्म आणि कर्तृत्व शिखरावर नेले. गोरा कुंभार



माती घडवत असताना संतांनी माणसांची मने घडवली.

वाटेत येणारी चंद्रभागा नदी ही केवळ पाण्याची धारा नाही, ती वारकऱ्यांच्या अश्रूंचे आणि भक्तीचे पवित्र तीर्थ आहे. टाळांचा ताल म्हणजे जणू मानवी हृदयाचे ठोके आहेत आणि अभंग म्हणजे आत्म्याचा श्वास. अभंग हे लोकाभाषेतील वेद आहेत, तर ज्ञानेश्वरी हे मराठी मातीचे प्रेमपत्र आहे. वारकरी संप्रदाय हा केवळ एक धर्म नसून ती एक परिपूर्ण जीवनपद्धती आहे, जिथे व्यसन नाही, द्वेष नाही, भेद नाही, तर केवळ नामाचा गजर आहे.

आजचे युग तंत्रज्ञानाचे आहे; हातात मोबाईल आहेत, जग जवळ आले आहे, पण माणसाची मने दुरावली आहेत. लोक भौतिक सुखासाठी धावत आहेत, पण वारकरी मात्र चालतात. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, हे चालणारेच स्वतःच्या आत्म्यापर्यंत सर्वात आधी पोहोचतात. कारण वारी आपल्याला नेटवर्क नाही, तर नेटकं आणि अर्थपूर्ण जगणं शिकवते.

पंढरपूरची वारी ही केवळ पंढरपूरपर्यंतची पायपीट नाही; ती माणसाच्या अंतःकरणापर्यंत पोहोचणारी आंतरिक यात्रा आहे. विठ्ठल आजही विटेवर उभा आहे, कारण तो माणसाच्या आत्मिक जागृतीची वाट पाहत आहे. प्रश्न एवढाच उरतोआपण पंढरीकडे चाललो आहोत की फक्त जगाच्या पाठीमागे आयुष्यभर धावत आहोत? जिस दिवशी प्रत्येक माणसाच्या मनात समता, करुणा, सेवा आणि प्रेमाची वीट रचली जाईल, त्या दिवशी प्रत्येक घर हे पंढरपूर होईल, प्रत्येक माणूस वारकरी होईल आणि प्रत्येक हृदयात तो सावळ्या रंगाचा पांडुरंग उभा राहील.

-------------

**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**रा.करकट्टा ता.जि.लातूर**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

# भर पावसात शिवाजी पार्कात विद्यार्थ्यांचा महापूर, नव्या पिढीचे ठाकरे बंधू रस्त्यावर





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** कॉक्रोच जनता पार्टीच्या समर्थनार्थ मुंबईच्या दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे विद्यार्थ्यांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात एकत्र येत आंदोलन केलं. या आंदोलनात अभिनेता अतुल कुलकर्णी सहभागी झाला आहे. विशेष म्हणजे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे, मनसे नेते अमित ठाकरे हे देखील या आंदोलनात सहभागी झाले. यावेळी आंदोलनस्थळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे देखील दाखल झाले. त्यामुळे या आंदोलनाला जास्त महत्त्व प्राप्त झालं. उद्धव ठाकरे मंचावर दाखल झाल्यानंतर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना २६ मार्चच्या मोर्चात सहभागी होण्याचं आवाहन विद्यार्थ्यांना केलं. यानंतर सर्वांनी राष्ट्रगीत म्हटलं आणि उद्धव ठाकरे आंदोलनस्थळावरुन निघून गेले.

आदित्य ठाकरे काय म्हणाले?

मी सर्वांना वचन दिलं होतं की, हे संपूर्ण देशाचं आंदोलन असणार आहे. इथे सर्वांच्या हातात तिरंगा आहे. आपण सर्व अभिजीत दिपके, सोनम वांगचुक आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी एकत्र आलो आहोत. इथे राजकीय भाषणं होणार नाहीत, असं मी वचन दिलं होतं. आम्ही इथे एकाच कारणाने इथे उभे आहोत. आपण इथे आंदोलनाला आले आहात. आपल्याला कुणीही हात लावू नये यासाठी आम्ही दोघेजण इथे उभे आहोत. हा देश आमचा आहे आणि आमचाच असणार आहे. कुणीही लाठी चालवणार नाही, असं आदित्य ठाकरे म्हणाले.

'आवाज दिल्लीपर्यंत जायला हवा'

आपण सर्वांनी सोनम वांगचुक यांचे आभार मानले पाहिजेत. त्यांनी २५ दिवस उपोषण केलं. उपोषण संपलं आहे. पण आंदोलन संपलेलं नाही. अभिजीत दिपके आणि अनेक तरुण आजही दिल्लीत जंतरमंतर मैदानावर बसले आहेत. आपला आवाज तिकडे दिल्लीपर्यंत पोहोचायला हवा, असं आवाहन आदित्य ठाकरे यांनी केलं.

तुम्ही त्यांचे मित्र बनू शकता का? आदित्य ठाकरेंचा सवाल

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे. तोपर्यंत शांत बसायचं नाही. तिसरी गोष्ट म्हणजे किती लोकांनी काल रात्री इन्स्टाग्रावर पंतप्रधान मोदींचा व्हिडीओ पाहिला? लाठी खालल्यानंतर आपण त्यांचे मित्र बनू शकता का? अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्यानंतर तुम्ही त्यांचे मित्र बनू शकता का? पेपर लीक झाल्यानंतर तुम्ही त्यांचे मित्र बनू शकता का?, असे सवाल आदित्य ठाकरे यांनी केले.

संविधानाचा अपमान करणाऱ्यांचे तुम्ही मित्र बनू शकता का? ते जेव्हा घाबरतात तेव्हा हिंदू-मुस्लीम करतात, त्यांचे मित्र तुम्ही बनू शकता का? जेव्हा ते घाबरतात तेव्हा जातीधर्माची, भाषेची बात करतात, आपण त्यांचे मित्र बनू शकतात का? जे आपत्तीच्या वेळी आपल्यात नाही तर परदेशात जातात, त्यांचे मित्र तुम्ही बनू शकतात का? धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा देईपर्यंत तुम्ही शांत बसू शकतात का?, असे देखील सवाल आदित्य ठाकरे यांनी केले.

ही शिवरायांची भूमी

इथे मी आहे, अमित ठाकरे आहेत, संजय राऊत आहेत, पण आमच्या सर्वांपेक्षा मोठा आवाज तुम्ही आहात. हा मंच आमचा नाही, हे आंदोलन आमचं नाही. कदाचित तुमच्यातील अनेक जण आम्हाला मतदान करत नसतील आणि त्यात काही चुकीचं नाही. तो तुमचा अधिकार आहे. मी नेहमीच आपल्या अधिकारांचा आदर करतो. ही भूमी छत्रपती शिवाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची भूमी आहे. प्रेमाने बोलणार असाल तर प्रेम मिळेल आणि घाबरवण्यासाठी याल तर वेदना मिळतील, असं आदित्य ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले.

राष्ट्रगीत गायनानंतर हे आंदोलन संपलं आहे. सर्व नेतेमंडळींकडून आंदोलकांना सावकाश घरी जाण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. पण आंदोलक अजून मैदान सोडायला तयार झालेले नाहीत.

## 'सीजेपी च्या आंदोलनात सहभाग घेताच नोकरी गमावली'; विद्यार्थ्यांना पाठिंबा देणाऱ्या प्राध्यापकावर अचानक कारवाई!

**बरेली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरण आणि त्यानंतर शिक्षण मंर्त्यावर जबाबदारी निश्चित करावी, या मागणीसाठी देशभरात आंदोलने सुरू आहेत. हजारो विद्यार्थी आणि केंद्र सरकारच्या धोरणांमुळे नाराज झालेले लोक या आंदोलनात सहभागी होत आहेत. उत्तर प्रदेशच्या बरेलीमधील एका प्राध्यापकानेही जंतर-मंतर येथील आंदोलनात सहभाग घेतला होता. मात्र त्यानंतर त्याला आपली नोकरी गमवावी लागली आहे. डॉ. मोहित भारद्वाज असे या प्राध्यापकाचे नाव आहे.

बरेलीमधील गन्ना उत्पादक (पदव्युत्तर) महाविद्यालयात भारद्वाज सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी करत होते. मात्र जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभाग घेतल्यानंतर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने त्यांना अचानक कामावरून काढून टाकले. ही कारवाई करताना त्यांना नोटीस किंवा चौकशी करण्यात आली नाही. त्यामुळे आंदोलनात सहभागी झाल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप भारद्वाज यांनी केला.

डॉ. भारद्वाज हे २० जून २०२४ रोजी महाविद्यालयात नोकरीला लागले होते. मात्र आता अचानक कारवाई झाल्यामुळे त्यांनी जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.

महाविद्यालयाने डॉ. भारद्वाज यांना ३० जून २०२७ पर्यंत वैध असलेले ओळखपत्र दिले होते. तसेच त्यांच्या कामाचे कौतुक करताना त्यांच्या समर्पक वृत्तीबद्दल मे २०२६ मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा सत्कारही केला होता. मात्र असे असूनही केवळ आंदलोनात सहभागी झाल्यामुळे कारवाई करण्यात आल्याचा आरोप भारद्वाज यांनी केला.

## न्यायालयाच्या कामकाजाचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यास बंदी, परवानगीशिवाय शेअर केल्यास होणार कारवाई

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** न्यायालयीन कामकाजाचे व्हिडिओ, ऑडिओ क्लिप्स आणि थेट प्रक्षेपणाचे (लाइव्ह-स्ट्रीम) चित्रीकरण परवानगीशिवाय सोशल मीडियावर पोस्ट करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर आदेश जारी केला आहे. यापुढे न्यायालयाच्या कामकाजाचे कोणतेही रेकॉर्डिंग पूर्वपरवानगीशिवाय डिजिटल प्लॅटफॉर्मवर शेअर किंवा प्रसारित केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. न्यायालयाची प्रतिष्ठा जपण्याच्या आणि कामकाजाचा गैरवापर रोखण्याच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

भारताचे सरन्यायाधीश आणि न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, सर्वोच्च किंवा कोणत्याही उच्च न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (लाइव्ह-स्ट्रीम) किंवा रेकॉर्डिंग परवानगीशिवाय सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर पोस्ट, रिपोस्ट, अपलोड किंवा शेअर करता येणार नाही. इतकेच नाही, तर अशा व्हिडिओंमधून कोणत्याही स्वरूपात पैसे कमावण्यावरही पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हा नियम मोडायचा असेल, तर संबंधित न्यायालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणात 'सेक्रेटरी जनरल'ची तर उच्च न्यायालयांच्या प्रकरणांमध्ये संबंधित उच्च न्यायालयाच्या 'रजिस्ट्रार जनरल'ची परवानगी घेणे आवश्यक असेल. ही परवानगी घेतल्याशिवाय कोणताही व्हिडिओ किंवा ऑडिओ इंटरनेटवर शेअर करता येणार नाही.

न्यायसंस्थेच्या मते, अनेकदा न्यायालयाच्या थेट प्रक्षेपणातून (लाइव्हस्ट्रीममधून) एखादी छोटी क्लिप किंवा छोटा भाग काढून तो एडिट केला जातो. व्हिडिओ किंवा ऑडिओमध्ये फेरफार करून किंवा तो वेगळ्याच संदर्भात सादर करून सोशल मीडियावर व्हायरल केला जातो. अशा अपूर्ण, छेडछाड केलेल्या किंवा बदल केलेल्या व्हिडिओंमुळे समाजात गैरसमज पसरू शकतात आणि थेट न्यायिक प्रक्रियेवर किंवा निकालांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. हा अनधिकृत वापर थांबवण्यासाठीच सर्वोच्च न्यायालयाने हे कठोर निर्बंध लागू केले आहेत.

या आदेशामुळे सर्वसामान्य नागरिकांना आणि सोशल मीडिया युजर्सना जरी निर्बंधांचा सामना करावा लागणार असला, तरी न्यायालयाचा हा आदेश वृत्तसंस्था आणि प्रसारमाध्यमांच्या पत्रकारितेला लागू होणार नाही. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, या निर्णयाचा वृत्त वार्ताकनावर किंवा बातमी प्रसारावर कोणताही परिणाम होणार नाही. म्हणजेच, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि अधिकृत वृत्तसंस्था पूर्वीप्रमाणेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित कायदेशीर घडामोडींच्या बातम्या प्रसिद्ध आणि प्रसारित करू शकतील. ही बंदी केवळ अनधिकृत ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंगचा वापर, शेअरिंग आणि त्यातून होणारी कमाई यावरच लागू आहे.

पुढील कायदेशीर कारवाई आणि निर्देश

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर न्यायालयीन कामकाजाच्या व्हिडिओंच्या अनधिकृत वितरणाला आळा घालण्याची मागणी करणाऱ्या एका याचिकेवर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सरकारांना नोटीस बजावून त्यांचे उत्तर मागितले आहे. यापुढे असा अनधिकृत वापर रोखण्यासाठी नेमक्या कोणत्या प्रभावी उपाययोजना करता येतील, हे सरकारांना स्पष्ट करावे लागेल. तसेच, या निर्णयाची व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे महासचिव आणि सर्व उच्च न्यायालयांच्या रजिस्ट्रार जनरल यांना हा आदेश आपापल्या न्यायालयांच्या अधिकृत वेबसाइटवर ठळकपणे प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' मध्ये शेतकरी कर्जमाफी संदर्भात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांना नवी उमेद देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' या महत्त्वपूर्ण निर्णयाविषयी सविस्तर माहिती देणारी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची विशेष मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या लोकप्रिय कार्यक्रमांमधून प्रसारित होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या सहकार्याने शासनाने शेतकरीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' जाहीर केली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचा भार कमी करून त्यांना नव्या उमेदीने शेती करण्यासाठी सक्षम करणे, आर्थिक स्थैर्य प्रदान करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे.

या विशेष मुलाखतीमध्ये सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी योजनेची उद्दिष्टे, पात्रता, लाभाचे स्वरूप, लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया, अंमलबजावणीची कार्यपद्धती तसेच शेतकऱ्यांना प्रत्यक्षात कसा लाभ मिळणार आहे, याची सोप्या आणि सविस्तर शब्दांत माहिती दिली आहे. योजनेबाबत असलेल्या विविध प्रश्नांची उत्तरेही या मुलाखतीतून मिळणार असून, प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत शासनाच्या या निर्णयाची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमातून ही मुलाखत दि. २७ व २८ जुलै २०२६ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून; तसेच 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमामध्ये ही विशेष मुलाखत मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे; तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवरही ही मुलाखत उपलब्ध होईल. या मुलाखतीचे निवेदन डॉ.मृण्मयी भजक यांनी केले आहे.

## आषाढीनिमित्त कुडाळमध्ये निसर्गातून साकारली ६० फुटी विठ्ठलमूर्ती

दैनिक आपला विदर्भ

**कुडाळ । प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने कुडाळ येथे निसर्गाच्या सान्निध्यात साकारण्यात आलेल्या ६० फूट उंचीच्या विठ्ठलमूर्तीने भाविकांचे लक्ष वेधून घेतले आहे. कलाप्रेमी डॉ. अनिकेत रविंद्र निब्रे यांनी आपल्या शेतात ओहळातील दगड, हिरवी पाने आणि विविध रंगांच्या फुलांचा वापर करून ही भव्य कलाकृती साकारली आहे.




यंदा मूर्तीला फुलांची व पानांची आकर्षक वस्त्रे आणि अलंकार परिधान करण्यात आल्याने तिचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. निसर्ग आणि भक्तीचा सुरेख संगम अनुभवण्यासाठी परिसरातील नागरिकांसह भाविक मोठ्या संख्येने भेट देत आहेत.

ही कलाकृती साकारण्यासाठी डॉ. अनिकेत निब्रे आणि चिरायू वारंग यांनी सलग आठ दिवस परिश्रम घेतले. या उपक्रमात रविंद्र निब्रे, ऋतिका निब्रे, प्रशम वारंग आणि अनिशा वारंग यांचेही सहकार्य लाभले. सामूहिक प्रयत्नांतून साकारलेली ही विठ्ठलमूर्ती आषाढी एकादशीच्या निमित्ताने परिसरातील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली आहे.

## महत्त्वाचे...

### इस्त्रायलमध्ये रोजगारासाठी निवडलेल्या उमेदवारांना इस्त्रायली मानकांनुसार निवासी प्रशिक्षण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यातील युवकांना दर्जेदार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत इस्त्रायलमध्ये रोजगारासाठी निवड झालेल्या उमेदवारांना तेथील कामकाजाच्या पद्धती, गुणवत्ता निकष आणि व्यावसायिक अपेक्षांशी सुसंगत बनविण्यासाठी इस्त्रायली मानकांनुसार निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या निर्णयानुसार, इस्त्रायलमधील प्लेसमेंटसाठी निवड झालेल्या पहिल्या गटातील १०६ उमेदवारांना दि. २७ जुलै २०२६ ते दि. ३१ जुलै २०२६ या कालावधीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (घ्ऊघ), औंध, पुणे येथे पाच दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये इस्त्रायलमध्ये सेवा क्षेत्रातील रोजगारासाठी निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश आहे. या उमेदवारांना संबंधित व्यवसायातील इस्त्रायली मानके, कामाच्या ठिकाणी पाळावयाची सुरक्षितता व गुणवत्ता मानके, आधुनिक बांधकाम पद्धती, व्यावसायिक शिस्त, कार्यसंस्कृती तसेच परदेशातील कामकाजासाठी आवश्यक कौशल्यांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणामुळे उमेदवारांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार असून, इस्त्रायलमधील नियोक्त्यांच्या अपेक्षांनुसार काम करण्यासाठी त्यांची तयारी अधिक सक्षम होईल. परदेशातील कार्यसंस्कृतीशी जलद जुळवून घेणे, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण कामकाज करणे, रोजगार टिकवून ठेवण्याची क्षमता वाढविणे तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कौशल्ये आत्मसात करून अधिक चांगल्या करिअरच्या संधी उपलब्ध करून घेण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे.या संदर्भातील शासन आदेश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत निर्गमित करण्यात आला असून तो महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळ...ारहरीरीहीीर. सीीं.ळप वर उपलब्ध आहे.

### सावळ्याची वारी मधून विठ्ठलभक्तीचा सुरेल गजर; श्रद्धेचा भावस्पर्शी अनुभव देणारं भक्तिगीत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** वारी सोहळ्याचं भक्तिमय वातावरण, विठ्ठल नामाचा अखंड गजर आणि वारकऱ्यांच्या अढळ श्रद्धेचा भावस्पर्शी अनुभव देणारं 'सावळ्याची वारी' हे नवीन भक्तिगीत नुकतंच प्रदर्शित झालं आहे. सुरेल संगीत, अर्थपूर्ण शब्द आणि वारीच्या परंपरेचं जिवंत चित्रण यामुळे हे गीत रसिकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे.

या भक्तिगीताला संगीतकार प्रफुल्ल प्रकाश यांनी संगीतबद्ध केलं असून, त्यांनीच आपल्या दमदार आणि भावपूर्ण आवाजात हे गीत साकारलं आहे. विठ्ठलभक्तीचा उत्साह, वारकऱ्यांचा आनंद आणि पालखी सोहळ्याचं दिव्य वातावरण संगीताच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या गीतातून करण्यात आला आहे.

या गाण्याचे बोल कृष्णा वाळके यांनी शब्दबद्ध केले असून, वारीची परंपरा, भक्ती आणि विठ्ठलप्रेम यांचं सुंदर दर्शन त्यांच्या लेखणीतून घडतं. तर सागर वाळके यांनी या गाण्याचं संकलन केलं असून, गीताची दृश्यात्मक मांडणीही आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे.

आषाढी वारीच्या निमित्ताने प्रदर्शित झालेलं 'सावळ्याची वारी' हे भक्तिगीत प्रत्येक विठ्ठलभक्ताला भक्तिरसात रंगवणारं ठरत आहे. टाळ-मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि विठ्ठलनामाचा गजर यामुळे हे गाणं वारीचा आध्यात्मिक अनुभव घरबसल्या देतं.

या गाण्याबद्दल गीतकार कृष्णा वाळके म्हणाले, ''सावळ्याची वारी' हे गीत साकारताना वारीचा भक्तिमय उत्साह आणि विठ्ठलभक्तीचा भाव प्रत्येक सुरातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. हे गीत प्रत्येक विठ्ठलभक्ताच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल, असा विश्वास आहे, वारी ही केवळ यात्रा नाही, तर श्रद्धा, समर्पण आणि भक्तीचा अखंड उत्सव आहे. त्या भावनेला शब्दांत मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न या गीतातून केला आहे. रसिकांना हे गीत नक्कीच आवडेल, अशी आशा आहे.''

### अभय भुतडा फाउंडेशनतर्फे ३०० विद्यार्थ्यांना रु.२१ लाखांच्या शिष्यवृत्तीचे वाटप

**पुणे । प्रतिनिधी :** अभय भुतडा फाउंडेशनने 'देवा भाऊ स्कूल स्कॉलरशिप' कार्यक्रमासाठी रु.२१ लाखांचे योगदान दिले आहे. या कार्यक्रमांतर्गत पुण्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमधील ३०० शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. हिंदू गर्जना प्रतिष्ठानच्या सहकार्याने २२ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

हिंदू गर्जना प्रतिष्ठानने आपल्या शाळांच्या आणि समाजातील कार्यकर्त्यांच्या नेटवर्कच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांची निवड केली. शैक्षणिकदृष्ट्या गुणवान असूनही आर्थिक अडचणींमुळे त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांना संघर्ष करावा लागत आहे.

महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात आले.

# महाराष्ट्र राज्य विधिमंडळ अंदाज समितीचा तीन दिवसीय बुलढाणा दौरा

## दौऱ्याच्या तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा; सर्व विभागांना वेळेत तयारी पूर्ण करण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधिमंडळ अंदाज समितीचा ३० जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत बुलढाणा जिल्ह्याचा तीन दिवसीय दौरा होणार आहे. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व संबंधित विभागप्रमुखांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली.

बैठकीत अंदाज समितीच्या दौऱ्यादरम्यान विविध शासकीय योजनांचा आढावा, विकासकामांचे सादरीकरण तसेच प्रत्यक्ष पाहणीबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांना त्यांच्या अखत्यारीतील विकासकामांची अद्ययावत व अचूक माहिती तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या. समितीसमोर सादर करण्यात येणारी आकडेवारी स्पष्ट, पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. देवरे म्हणाले की, विधिमंडळ अंदाज समितीचा हा दौरा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून कोणत्याही विभागाने कामात हलगर्जीपणा करू नये. प्रशासकीय स्तरावरील सर्व तयारी वेळेत पूर्ण करून समितीसमोर प्रभावी सादरीकरण करावे.

दौऱ्यादरम्यान समितीकडून जिल्ह्यातील विविध विकासकामे, पायाभूत सुविधा आणि जनकल्याणकारी योजनांची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. कृषी, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, आरोग्य, शिक्षण आदी विभागांनी आपले अहवाल अंतिम स्वरूपात तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच समिती सदस्यांच्या प्रश्नांना तात्काळ व अचूक उत्तरे देता यावीत, यासाठी सर्व विभागप्रमुखांनी संपूर्ण माहितीसह उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय समिती सदस्यांच्या निवास, वाहतूक व्यवस्था, भोजन, दौऱ्याचे नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती तयारी पूर्ण करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाव खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, समाधान गायकवाड तसेच उपविभागीय अधिकारी, जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# ३२,६०० शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा प्रश्न निर्णायक टप्प्यात

## रविकांत तुपकरांचा विमा कंपनीला इशारा; जिल्हाधिकाऱ्यांकडून राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याचा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील २०२४ मधील तब्बल ३२ हजार ६०० वंचित शेतकऱ्यांच्या पीक विम्याचा प्रश्न निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी पीक विमा कंपनीच्या कारभारावर तीव्र आक्षेप नोंदवत शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाची माहिती प्रशासनासमोर मांडली.

बैठकीत तुपकर यांनी पीक विमा मंजुरीतील त्रुटी, पात्र शेतकऱ्यांना लाभ न मिळाल्याच्या तक्रारी आणि कंपनीच्या कार्यपद्धतीबाबत ठोस पुरावे सादर केले. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांनी संबंधित विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. तसेच संपूर्ण प्रकरणाचा अहवाल व प्रस्ताव जिल्हा पीक विमा तक्रार निवारण समितीमार्फत राज्य सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी रविकांत तुपकर म्हणाले, ''पीक विमा कंपनीची



मनमानी आता खपवून घेतली जाणार नाही. २०२४ आणि २०२५ मधील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला त्याच्या हक्काचा पीक विमा मिळाल्याशिवाय हा लढा थांबणार नाही. शेवटच्या शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील.

या बैठकीतील निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो वंचित शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, आता राज्य सरकार आणि संबंधित विमा कंपनीच्या पुढील निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## जळगावात विचित्र तिहेरी अपघात; आयशर अन् एसटीचालक जखमी, बसमधील प्रवासी थोडक्यात बचावले

**जळगाव । प्रतिनिधी :** जिल्ह्याच्या धरणगाव तालुक्यातील पाळधी बायपासजवळ कोळशाने भरलेला ट्रोला, 'जळगाव-शिरपूर' एसटी बस आणि आयशर टेम्पो या तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या तिहेरी अपघातात आयशर चालक गंभीर जखमी झाला असून एसटी बस चालक, महिला वाहक (कंडक्टर) तसेच अन्य चार ते पाच प्रवासी देखील जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दरम्यान, अपघातानंतर कोळसा ट्रॉली चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली, सुदैवाने बसमधील प्रवाशांचा जीव वाचला. मात्र, अपघातामुळे २ किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाल्याने रस्ता बराचवेळ जाम झाला होता.

जळगावकडून धरणगावच्या दिशेने जाणाऱ्या कोळशाच्या ट्रॉलीला ओव्हरटेक करत असताना समोरून येणाऱ्या आयशर टेम्पोशी एसटी बसची समोरासमोर धडक झाली. अपघाताची तीव्रता लक्षात येताच ट्रॉली चालकाने प्रसंगावधान राखत वाहन रस्त्याच्या डाव्या बाजूला उतरविल्याने एसटी बसमधील प्रवाशांचे प्राण वाचले, त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. अपघातानंतर दोन्ही बाजूंना सुमारे दोन किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी झाली होती.

# जिल्हा कारागृहात ३५० बंद्यांची क्षयरोग तपासणी; १०० दिवसांच्या क्षयरोगमुक्त भारत अभियानाला बळ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असलेल्या क्षयरोगमुक्त भारत अभियान १०० दिवस मोहीम अंतर्गत बुलढाणा जिल्हा कारागृहात बंद्यांसाठी विशेष क्षयरोग तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आधुनिक डिजिटल एक्स-रे मशीनच्या साहाय्याने कारागृहातील एकूण ३५० बंद्यांची क्षयरोग तपासणी करण्यात आली.

जिल्हा कारागृह, बुलढाणा आणि जिल्हा क्षयरोग कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २३ जुलै) हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कारागृहाच्या अधीक्षक मेघा शंकर बाहेकर उपस्थित होत्या. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी बंद्यांना क्षयरोगाची लक्षणे, प्रतिबंध, वेळेत निदान आणि उपचाराचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच क्षयरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करून उपचार पूर्ण करण्याचे आवाहन केले.

या शिबिरात आधुनिक डिजिटल एक्स-रे मशीनच्या साहाय्याने कारागृहातील एकूण ३५० बंद्यांची क्षयरोग तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान क्षयरोगाचा संशय असलेल्या बंद्यांचे थुंकीचे नमुनेही प्रयोगशाळा तपासणीसाठी संकलित करण्यात आले. या उपक्रमामुळे कारागृहातील बंद्यांमध्ये क्षयरोगाचे लवकर निदान होऊन आवश्यक उपचार वेळेत उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. मयूर पडोळ, मिश्रक गोपाल खोंडे, कारागृह शिपाई चंद्रकांत महाले, वैभव राणे, हवालदार संजय मदारकर तसेच जिल्हा क्षयरोग कार्यालयाच्या वैशाली पवार, राजेंद्र उघडे, राजेंद्र सुरडकर, राजेंद्र राठोड, सिद्धेश्वर सोळंकी आणि सर्व कारागृह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी कारागृहासारख्या संवेदनशील ठिकाणी अशा प्रकारचे तपासणी व जनजागृती उपक्रम प्रभावी ठरत असून, क्षयरोगमुक्त भारत या संकल्पनेला बळकटी देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ :

# बुलढाणा जिल्ह्यात १२ हजार १०७ शेतकरी पात्र; आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील सहकारी बँकांचे १२ हजार १०७ शेतकरी पात्र ठरले असून, योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.



या योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण तसेच ॲग्रीस्टॅक () अंतर्गत नोंदणी व प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. तसेच, आधार क्रमांक आणि बँक खाते परस्पर लिंक नसल्यास संबंधित सहकारी संस्था किंवा बँकेशी संपर्क साधून ते तातडीने लिंक करून घ्यावे.

आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि इतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळील सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र किंवा सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान काही अडचणी अथवा तक्रारी उद्भवल्यास संबंधित तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीकडे दाद मागण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी कोणताही विलंब न करता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या या महत्त्वाकांक्षी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

## पूर्व द्रुतगती महामार्गावर कारला भीषण आग; ठाणे आणि मुंबईत मोठी वाहतूक कोंडी

**ठाणे/प्रतिनिधी :** पूर्व द्रुतगती महामार्गावरील कोपरी रेल्वे पूलावरुन वाहतूक करणाऱ्या कारने शुक्रवारी रात्री अचानक पेट घेतला. या घटनेमुळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून येथील वाहतूक वळविण्यात आली होती. त्याचा परिणाम ठाणे आणि मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थेवर झाला. ठाण्यातील कोपरी आनंदनगर ते मुंबई येथील भांडुपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीमुळे मुंबईहून ठाण्याच्या दिशेने वाहतूक करणाऱ्या प्रवाशांना कोंडीचा सामना सहन करावा लागला.

पूर्व द्रुतगती महामार्गावरून वाहतूक करणारी कार शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास कोपरी येथील रेल्वे पूलावर आली असता, कारने अचानक पेट घेतला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वाहतूक शाखेचे कर्मचारी आणि ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले.

सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक पोलिसांनी घटनास्थळावरून वाहतूक वळविली होती. तसेच, महामार्गावर साकेत-आनंदनगर उन्नत मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे.

# राहुल गांधींच्या विरोधात भाजपचे बुलढाण्यात आंदोलन

## जिल्हा काँग्रेस कार्यालयासमोर निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राजकीय हेतूने गैरफायदा घेत अराजकतेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत भारतीय जनता पक्ष आणि भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शुक्रवारी बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक येथे जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी भाजप व भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत राहुल गांधी यांच्या विरोधात निषेध व्यक्त केला. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी प्रतीकात्मक स्वरूपात जोडे मारून निषेध नोंदविला. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ राजकीय वातावरण तापले होते.

यावेळी बोलताना भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा वापर करून काँग्रेस देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. तर भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष संतोष काळे यांनी राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांची दिशाभूल करणे थांबवावे आणि अशा राजकारणाचा भाजप तीव्र निषेध करत असल्याचे सांगितले. आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



## वृत्तविशेष...

# दहावी, बारावीच्या परीक्षेतील विशेष गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** प्रतिकूल परिस्थितीवर मात करून इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या बालगृह, निरीक्षणगृह आणि खुले निवारा गृहातील विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा माटुंगा येथील बेहराम जी जीजीभाई होम फॉर चिल्ड्रन्स येथे झाला. मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय आणि बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष गुणवंत गौरव व सत्कार सोहळा – २०२६ च्या कार्यक्रमास बाल कल्याण समिती अध्यक्ष महादेव सावंत, मुंबई शहर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार, बाल कल्याण समिती सदस्य श्याम मिस्त्री, अरुणा काटकर, मुग्धा दांडेकर, उषा गायकवाड यांच्यासह आशियाना फाउंडेशनचे विनोदभाई शाह, ग्रेस फाउंडेशनचे शंकर मुगलखोद, हमारा फाउंडेशनच्या प्रिया शेंडे, ऑल इज वेल फाउंडेशनचे प्रकाश राजन, बी.जे होम संस्थेच्या अधीक्षिका अनघा माळवी, जिल्हा परिविक्षा अधिकारी महेश पाटील आदी उपस्थित होते.

बाल कल्याण समितीचे अध्यक्ष महादेव सावंत यांनी प्रतिकूल परिस्थितीत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शिक्षण व करिअर वाटचालीसाठी मोठी स्वप्ने बाळगण्याचे आवाहन केले. महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मर्यादित सुविधांमध्येही जिद्दीच्या जोरावर यश मिळवलेल्या मुलांची ही कामगिरी अतुलनीय असून अशा गौरव सोहळ्यांमुळे मुलांचा आत्म विश्वास अधिक दृढ होतो, असे प्रतिपादन त्यांनी केले.

प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची कास धरून यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा हा सन्मान इतर मुलांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या यशामागे संस्थांचे अधीक्षक, शिक्षक, कर्मचारी आणि मार्गदर्शक यांचेही महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद करून त्यांचेही यावेळी अभिनंदन करण्यात आले. मानवी तस्करीपासून स्वत:ला कसे सुरक्षित ठेवावे याची माहिती देणारी चित्राफित यावेळी दाखविण्यात आली. कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्रे आणि शुभेच्छा देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचा यथोचित गौरव करण्यात आला. सूत्र संचालन अनिशा गोरे यांनी कले. आभार मुंबई शहर जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अमोल जाधव यांनी मानले.

# जुलै संपत आला तरी महाराष्ट्रातील आठ जिल्हे पावसाच्या प्रतीक्षेत



**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईसह महाराष्ट्रातीळ अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हाहा:कार माजवला आहे. एका बाजूला कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात धुवांधार पावसाने नदी-नाले ओसंडून वाहत असून पुराचे संकट झाले आहे. पालघर ते गुजरात हा महामार्ग मुसळधार पावसामुळे बंद आहे. नाशिकमध्ये गोदावरीनं धोक्याची पातळी ओलांडल्याने पूर आला आहे. परंतु दुसऱ्या बाजूस राज्यातील तब्बल ८ जिल्ह्यांमध्ये पावसाने अद्याप हजेरी लावली नाही आहे. त्यामुळे बळीराजाची चिंता शिगेला पोहोचली आहे. राज्यातील काही भाग पाण्याखाली आहे तर काही भागातील शेतकरी थेंबाथेंबासाठी प्रतीक्षेत आहेत.

पालघर आणि नाशिकला पावसानं झोडपलं पालघर, ठाणे, रायगड आणि नाशिक या जिल्ह्यांमध्ये गेल्या २४ तासांत पावसाचा प्रचंड हाहा:कार पाहायला मिळाला. पालघर आणि गुजरातच्या वलसाड भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे रेल्वे ट्रॅकवर पाणी साचले असून, अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. नाशिकमध्ये मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पाण्याची पातळी वेगाने वाढली आहे. नदीकिनारी असलेलं प्रसिद्ध मारुती मंदिर पाण्याखाली गेलं आहे. सायखेडा पूल पाण्याखाली गेला असून चांदोरी गावातील बाजारपेठ आणि घरांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. हवामान विभागाने आजही या भागात 'रेड अलर्ट' जारी केला आहे.

८ जिल्हे अजूनही पावसाच्या प्रतीक्षेत कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस कोसळत असताना, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांमध्ये पाऊस रिमझीम बरसत आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर, धाराशीव, सोलापूर आणि बीड या जिल्ह्यांमध्ये आज तुरळक पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आता जुलै महिना संपायला जेम तेम आठवडा उरला आहे. अर्धा मान्सून संपला आहे तरी राज्याच्या अनेक भागात अद्याप दमदार पाऊस पडलेला नाही. पाऊस न पडल्याने पिके करपू लागली आहेत. आजही राज्यातील आठ जिल्हे पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. तिथले शेतकरी हताशपणे आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.